# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2,143 | Indexed (IIJIF | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

10th February 2018    Issue: I Vol. I


On the Occasion of ICSSR Sponsored
Interdisciplinary National Seminar on

## Rural and Tribal Communities: Issues, Challenges and Remediation

Indian Council of Social Science Research

**Organised by**

**VES's Sarvajanik Arts & Commerce College, Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar**






**Editor-in-Chief**
**Mr. Arun Godam**

**Guist Edoitors**
**Principal Dr. A. T. Patil**
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

**Convener**
**Assist. Prof. Ananda M. Kalbande**
Head, Dept. of History,
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

**Secretary**
**Assist. Prof. Rakesh B. Patil**
Department of Sociology
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar



www.rjournals.co.in

On the Occasion of ICSSR Sponsored

Interdisciplinary National Seminar on

# Rural and Tribal Communities: Issues, Challenges and Remediation

**SPECIAL ISSUE**

**10th February 2018 Issue: 1 Vol. 1**

**Organised by**

## VES's Sarvajanik Arts & Commerce College, Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar


**Editor-in-Chief**

**Mr. ArunGodam**

**Guist Editors**

**Principal Dr. A. T. Patil**

Sarvajanik Airs & Commerce College,

Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

**Convener**

**Assist. Prof. Ananda M. Kalbande**

Head, Dept. of History,

Sarvajanik Airs & Commerce College,

Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

**Secretary**

**Assist. Prof. Rakesh B. Patil**

Department of Sociology

Sarvajanik Airs & Commerce College,

Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | महात्मा गांधीजीचा ग्रामीण विकासात्मक दृष्टिकोन | डॉ. सिध्दार्थ हरिदास मेश्राम | 120 |
| 34 | भारतीय शेतीक्षेत्राचे अर्थशास्त्र आणि स्वामीनाथन आयोग | प्रा.विलास अंकुशराव सोळुंक | 124 |
| 35 | ग्रामीण विकासासंदर्भात गांधीजींच्या आर्थिकविचाराची आधुनिक भारताला आवश्यकता | प्रा.डॉ किरण .ए.वारके | 127 |
| 36 | आदिवासी-कोकणी-कोकणा-कुंकणा जनजाति के विवाह गीत | डॉ. गोकुलदास सोनु ठाकरे | 129 |
| 37 | महिला सबलीकरणात शिक्षणाचे योगदान | प्रा.गांगुर्डे धवलू महादु | 133 |
| 38 | आदिवासी महिलांमधील राजकीय जागृती आणि राजकीय सहभाग | प्रा.डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | 137 |
| 39 | अनुसुचित जमाती तथा आदिवासीच्या संविधानीक आणि न्यायीक तरतुदी | प्रा. डॉ. प्रकाश नामदेव पाटील | 140 |
| 40 | हिन्दी साहित्य में आदिवासी लोकसंस्कृति | डॉ. अशोक एम. पवार | 143 |
| 41 | खानदेशातील क्रांतीकारी संत गूला महाराज यांचे समाज प्रबोधनाचे काय | प्रा.डॉ.निशांत शेंडे | 147 |
| 42 | आदिवासी भागातील बालकांच्या आरोग्य व कुपोषणाचा अभ्यास | प्रा.शरद भिमराव काकुर्डे | 149 |
| 43 | आदिवासी समाजाच्या व सांस्कृतिक समस्या | प्रा. लीना विलास गादेवार | 152 |
| 44 | भारतातील शेतकरी चळवळ | प्रा. सुनिता संतोष पवार | 156 |
| 45 | आदिवासी समाजाचा सामाजिक आणि आर्थिक विकास | सहा. प्रा. आर. एन. नगराळे | 158 |
| 46 | ``आदिवासी बालकांच्या कुपोषणाची समस्या व उपाययोजना`` (संदर्भ - नासिक व धुळे जिल्हा) | प्रा.डॉ. कल्याण विठ्ठल मोरे | 160 |
| 47 | आदिवासी समाजातील कुटुंब नियोजन कार्यक्रमातील अडथळे | प्रा.सुहास भास्कर नांद्रे | 164 |
| 48 | स्वात्रंत्र्योत्तर काळातील आदिवासी कल्याण कार्यक्रम | प्रा.स्मिता ओंकार माळवे | 169 |
| 49 | ग्रामिण–आदिवासी स्त्री सक्षमिकरण एक विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सिताराम के. मोगल | 172 |
| 50 | वीर बिरसा मुंडाचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान | प्रा. सुभाष श्रावण धनगर | 175 |
| 51 | ग्रामीण आणि आदिवासी जमातीच्या विकासाच्या कृषी योजना | डॉ.वायसे शामराव भगवान | 177 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol. I , 10th Feb. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# भारतातील शेतकरी चळवळ

**प्रा. सुनिता संतोष पवार**
*समाजशास्त्र विभाग, कला आणि वाणिज्य महाविद्यालय , अक्कलकुवा जि. नंदुरबार*

**(44)**

भारत हा कृषि प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अनन्य साधारण आहे. त्यामुळे शेती हा आजही एक प्रमुख व्यवसाय आहे. भारतीय लोकसंख्येत ६४ % जनता कृषिक्षेत्रावर अवलंबुन आहे. आणि त्यातील ७० % शेतकरी अल्पभुधारक आहेत. त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा व समाज व्यवस्थेतील एक मुलभुत घटक आहे. म्हणून त्यांचे स्वास्थ व हित जपणारी संघटना ही काळाची गरज ठरली.

भारतातील शेतकरी चळवळ व आदोलनांना स्वातंत्र्यपुर्व काळात जहागीरदार व जमीनदार यांच्या विरोधाची तर स्वातंत्र्योत्तर कालखंडात दुध व शेतमालाला योग्य भाव आणि कर्जासारख्या सरकार संचलित विषयांची पार्श्वभुमी आहे. ब्रिटीश राजवटीत देशावर प्रथमच एकछत्री अंमल निर्माण झाला त्यापुर्वी देशात सरंजामशाही व राजे राजवाडे आणि संस्थानिकांची सत्ता होती. या पैकी काही राजे व संस्थानिक यांनी शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेतले आणि शेतीला उपयुक्त सुधारणा केल्या. शेतक-यांना राजाच्या मर्जीवर, कृपेवर अवलंबुन रहावे लागत होते. आपल्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी आंदोलन त्या काळी शक्य नव्हते. शेतीतुन येणारे उत्पादन व उत्पन्नातील ठराविक हिस्सा राजाच्या खजिन्यात जमा होत असे.

ब्रिटीश काळात काही सामाजिक सुधारणा झाल्या दळण वळणाची साधने निर्माण झाली. शेतक-यांना अन्य प्रांतातील घडामोडींचे ज्ञान मिळू लागले. आणि त्यातुन आपल्या मागण्यांबद्दल शेतकरी जागृत झाला.

**भारतातील शेतकरी चळवळ :-**

- **तेभागा चळवळ :-**

पश्चिम बंगाल मधील शेतक-यांनी आपल्यावर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी उभा केलेला लढा म्हणजे तेभागा चळवळ होय. प्रारंभिक अवस्थेत जमीनदारांच्या जमीनी जोतेदारांच्या मध्यस्थीने शेतक-यांना कसण्यासाठी द्यायच्या व शेतीतुन येणा-या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा खंड म्हणून जमीनदारांना द्यावा अशी अट यात होती. शेती उत्पन्नातील चार भागांपैकी केवळ एक भाग जमीन मालकाला आणि तीन भाग स्वतः ठेवावे अशी आग्रही भुमिका शेतक-यांनी घेतली. १९४६ मध्ये पुर्व बंगामध्ये सुरू झालेल्या या चळवळीला आधार देण्याचे काम किसान सभेद्वारा झाले.

- **नक्षलवादी चळवळ (१९६७)**

पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्हयातील संथाळ शेतक-यांनी जमीनदारांविरूध्द १९६७ सालच्या मे महिन्यात उठाव केला आणि त्यांच्या जमीनी ताब्यात घेतल्या. आदिवासी शेतक-यांविरूध्द कृती करण्यासाठी पोलीस गेले असता शेतक-यांनी पोलीसांना सशस्त्र प्रतिकार केला. नक्षलवादी उठावाची ही सुरूवात होती. १९६७ मध्ये जवळ जवळ २ महिने चाललेल्या नक्षलवादी सशस्त्र उठाव संपुष्टात आला होता. १९६९ नंतर नक्षलवादंयाची चळवळ कमी अधिक प्रमाणात बिहार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, व महाराष्ट्र राज्याचा काही भाग या ठिकाणी चालु राहीली.

- **जमीन बळकाव आंदोलन : -**

१९७० साली किसान सभा आणि शेतमजुर संघ यांनी अखिल भारतीय पातळीवर "जमीन बळकाव" आंदोलन केले. ही जमीन भुमिहीनांमध्ये वाटणे हा चळवळी मागचा हेतू होता. या जमीन बळकाव आंदोलनात काही ठिकाणी मंत्र्याच्या जमीनी ही बळकावण्यात आल्या. शांततेने झालेल्या या सत्याग्रहात अनेक लोकांनी स्वतःला अटक करून घेतली.

१९७० सालानंतर हरित क्रातीचे विपरीत परिणाम शेतक-यांना जाणवायला लागले होते. नगदी पिके पिकवणा-या शेतक-यांवर बाजारपेठेत होणा-या किंमतीच्या चढ- उताराचा मोठा परिणाम होत होता. या जोडीलाच भांडवली शेती करणा-या श्रीमंत शेतक-यांकडून शेतमजुरांची होणारी पिळवणुक वाढली होती. गरीब व अज्ञानी आदिवासींनी फसवून आदिवासींच्या जमीनी लुबाडण्याचेही प्रकार घडले होते.

तामिळनाडु मध्ये शेतक-यांनी श्री नारायणस्वामी नायडू या नेत्याच्या नेतृत्वाखाली विजेचे वाढलेले दर देण्यास नकार दिला व आपला निषेध तिव्र करण्यासाठी कर बंदीचे आंदोलन केले. बिहारमध्ये संथाळ, मुंडा व इतर आदिवासी शेतमजुरांनी आणि कोळसा खाण कामगारांनी एकत्र येऊन "झारखंड मुक्ती मोर्चा" या संघटनेखाली आपल्यावरील अन्याय दुर करण्यासाठी संघर्ष केला.

- **शेतकरी संघटना :-**

महाराष्ट्रातील समकालीन शेतकरी आंदोलनामधील सर्वात प्रभावी चळवळ शेतकरी संघटनेने उभी केली. या चळवळवीने शेतकरी आंदोलनाचे स्वरूप बदलले तसेच मागण्याही बदलल्या. या चळवळीमध्ये महाराष्ट्रातील शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाला. १९८० मध्ये शेतकरी संघटनेने शरद जोशीच्या नेतृत्वाखाली कांद्याच्या भावासाठी रास्ता रोको आंदोलन केले. रास्ता रोको व रेल रोको च्या आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्ग रेल्वे बंद पडल्यामुळे मोठी खळबळ उडाली व आंदोलन व त्यांचे विचार राष्ट्रीय वृत्तपत्राद्वारे देशापुढे आले. या आंदोलनात शेतकरी जमीन मागत नव्हते. शेतमजुरी वाढविण्याचीही मागणी करीत नव्हते तर आपल्या मालाला भाव वाढवून मागत होते.

शेती मालाच्या उत्पादननाचा खर्च भरून येईल असे हमी भाव, किंमत त्यासाठी जाहीर करायला शासनाला भाग पाडणे हे संघटनेच्या आंदोलनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी संघटनेने वेळोवेळी आंदोलन केली.

१. **कांदा आंदोलन :-**

सन १९८० मध्ये चाकणच्या बाजारातील कांद्याचे भाव घसरले आणि शेतकरी संघटनेने भाव वाढवून देण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले.

२. **ऊस आंदोलन :-**

ऊस पिकवणा-या शेतक-यांनी शेतकरी संघटनेच्या नेत्याच्या नेतृत्वाखाली ऊसाचा भाव ३०० रू. प्रतिटन मिळावा. या मागणीसाठी आंदोलनाची तयारी केली. त्यासाठी साखर कारखान्यांना ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. सरकारने शेतक-यांवर दडपण आणण्यासाठी आवश्यक पाणी पुरवठा व विजपुरवठा बंद केला नाशिक, धुळे व नगर जिल्हयातील शेतक-यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. पोलीसांनी आंदोलक शेतक-यांवर लाठीमार व गोळीबार केला. त्यात दोन शेतकरी मरण पावले तेव्हा शरद जोशींनी तुरूंगात उपोषण सुरू केले त्याचा परिणाम म्हणून मुख्यमंत्र्यांनी ऊसाचा ३०० रू. प्रतिक्विंटल भाव देण्याची घोषणा केली.

**सारांश :-**

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या आंदोलनाच्या मागण्या मुख्यतः जमीनदारी, सावकारी नष्ट करणे जमीन सुधारणा अंमलात आणणे. शेतमजुरांच्या मजुरीत वाढ करणे, वेठबिगारी नष्ट करणे, ईत्यादी होत्या. शेतकरी संघटनेने शेतीमालाला योग्य भाव, शेतक-यांसाठी पिक विमा उतरविणे, समाजातील दुर्बल घटकांना न्याय, ग्रामिण व शहरी समाजातील आर्थिक विषमता कमी करणे, शासनाच्या विसंगत धोरणाला विरोध करणे व शेतकरी महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केला.

**संदर्भ सुची :-**

१. जोशी शरद :- शेतकरी संघटना, विचार आणि कार्यपध्दती अलिबाग, शेतकरी प्रकाशन १९८२
२. देसाई दत्ता :- महाराष्ट्रातील दुष्काळ, पुणे मागोवा प्रकाशन १९८७
३. पाध्ये रमेश :- शेतकरी आंदोलन, मुंबई एल्गार प्रकाशन १९८५
४. इंटरनेट :- गुगल

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 4 No. : 3 Issue - 12 Sept.-Dec.2017 ISSN No. :2347-9639

UGC Approved Journal
UGC
No.64299

34 Years

# VICHAR MANTHAN

IIJIF
Impact Factor
2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Human Rights and Challenges




महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## मानव अधिकार आणि आव्हाने

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

अथर्व पब्लिकेशन्स

- मानवी हक्क व आदिवासींचे धर्मांतर ................ १६३
  - किशोर सोनवणे, प्रा. डॉ. सुधाकर जाधव
- मानवी हक्कासाठी शिक्षण ........................ १६५
  - प्रा. सूर्यवंशी मंगला सूरसिंग
- मानवाधिकार एवं आदिवासी समाज की ........... १६७ समस्याएँ : हिन्दी साहित्य के संदर्भ में।
  - प्रा. मुरलीधर बी. वसावे
- मानवी हक्क आणि बालशिक्षण .................... १७०
  - प्रा. एन. के. जाधव, प्रा. डॉ. सुरेंद्र मोरे
- मानव अधिकार आणि स्त्री ........................ १७२
  - प्रा. सौ. सुनीता संतोष पवार
- मानवी अधिकार आणि इतिहास यांचा सहसंबंध ... १७४ : एक अभ्यास
  - प्रा. एस. सी. सोनवणे
- रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात प्रतिबिंबित......... १७६ झालेले मानव अधिकार
  - प्रा. सुनील भावराव देसले
- मानवी अधिकार आणि समकालीन आव्हाने ....... १७९
  - प्रा. सुनील अजाबराव पाटील
- मानव अधिकार आणि भारतीय कायद्यातील पर्यावरणविषयक तरतुदी ......................... १८१
  - प्रा. सुनील पाटील, प्रा. दिलीप राठोड
- मानव अधिकार आणि महिला सबलीकरण ....... १८
  - श्रीमती वैशाली गुलाबराव सावंत
  - प्रा. दिलीप हरसिंग राठोड
- मानवी हक्क आणि प्रसार माध्यमांची भूमिका ..... १८
  - प्रा. सोनवणे वैशाली रवींद्र
- मानवी हक्कांची सद्य:स्थिती आणि आव्हाने....... १८
  - विश्वास दामोधर तळेकर
- जागतिकीकरणाचे मानवी हक्कांवरील परिणाम ..... १
  - प्रा. वाय. डी. बेडिस्कर
- मानवी हक्क व स्त्री शिक्षण ......................... १
  - प्रा. योगेश जगन्नाथ कोरडे
- दलित साहित्य आणि मानवाधिकार ............... १
  - प्रा. डॉ. प्रकाश अर्जुन भामरे
- मानवी हक्क आणि एड्सग्रस्त महिला ............... १
  - प्रा. डॉ. मनीषा अनिल कचवे
- साक्री तालुक्यातील आदिवासी जमातींच्या ....... १ समाजजीवनाचा सर्वांगीण अभ्यास
  - प्रा. डॉ. सुधाकर लोटन जाधव
  - दिलीप महिपती लोखंडे
- मानव अधिकार संकल्पना आणि मूल्य शिक्षण .... १
  - प्रा. एस. एस. वसावे

# मानव अधिकार आणि स्त्री

**प्रा. सुनीता संतोष पवार**
समाजशास्त्र विभाग
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा

मनुष्याला सर्वांगिण विकासासाठी अधिकारांची किंवा हक्कांची आवश्यकता असते. अधिकार म्हणजे समाज जीवनाच्या अशा अटी आहेत की, ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वत:चा सर्वांगिण विकास करू शकत नाही. मनुष्य हा जन्मत: स्वतंत्र असून जन्मत:च त्याला काही हक्क प्राप्त होतात. मानवाचे जीवन सुखी, संपन्न व्हावे त्याला जन्मताच प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या मानवी हक्कांची संकल्पना उदयास आली. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. सर्व माणसे जन्मत: स्वतंत्र असतात. सर्वांचा दर्जा समान असतो. धर्म, जात, वंश, भाषा, लिंग, शिक्षण, जन्मस्थळ व आर्थिक स्थिती अशा अन्य कारणांवरून व्यक्ती व्यक्तीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान हक्क मिळावेत, प्रत्येकाला समान हक्क मिळाले पाहिजेत याला मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात महत्त्व दिलेले दिसते.

संविधानाच्या तरतुदी प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी कार्यपालिका, न्यायपालिका यांच्यावर आहे. जगात आणि देशात महिलांचा दर्जा बदलविण्यासाठी कार्य होत असताना त्यांच्यावर अत्याचार का वाढतात? हे समजण्यासाठी संविधानातील तरतूदी, कायदे व योजना समजने आवश्यक आहे.

- **संविधानातील तरतुदी**

१) अनुच्छेद १४ – कायद्याने समानता व संरक्षण.

२) अनुच्छेद १५(३) – राज्य सरकार महिला व बालकांसाठी विशेष तरतूद करू शकते.

३) अनुच्छेद १६ – पदनियुक्ती, नोकरी या मध्ये धर्म, वंश,लिंग यावरून भेदभाव करता येणार नाही.

४) अनुच्छेद ३९ – स्त्री पुरुष दोघांना समान वेतन.

५) अनुच्छेद ४२ – कामाच्या ठिकाणी न्याय व सुरक्षितता आणि प्रसूती साहाय देण्याची सोय.

६) अनुच्छेद ५१ – स्त्रियांच्या प्रतिमेला हानी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करणे.

७) निवडणूक लढविण्याचा अधिकार.

८) शासन–प्रशासनात कोणतेही पद भूषविण्याचा अधिकार.

९) संपत्ती विकत घेणे, वडील आणि पतीच्या संपत्तीत वाटा.

**भारतीय राज्य घटनेतील स्त्रीयांसंबंधी कायदे**

**१) विवाहासंबंधी कायदे**

- हिंदूविवाह कायदा, १९५५
- हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा, १८५६
- आर्य विवाह विधिवत कायदा, १९३७
- मुस्लीम विवाह कायदा, १९८६
- हिंदू दत्तक व निर्वाह कायदा, १९५६

**२) मालमत्ता संबंधी कायदा**

- हिंदू उत्तराधिकारी कायदा, १९५६
- विवाहीत स्त्रियांचा संपत्ती कायदा, १९५९
- हिंदू वारसा हक्कात मालमत्तेत समान वाटप कायदा, २००५

**३) फौजदारी कायदे**

- गर्भपात कायदा, १९७१
- गर्भजल परीक्षा कायदा, १९८८
- हुंडा प्रतिबंधक कायदा, १९८३
- बलात्कार प्रतिबंधक कायदा, १९८३
- स्त्री अश्लीलता प्रतिबंधक कायदा, १९८६
- छेडछाड प्रतिबंधक कायदा, १९७८
- कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५

**४) कामगार स्त्रियाचे अधिकारविषयक कायदे**

- मातृत्व लाभ कायदा, १९६१
- समान वेतन कायदा, १९७६
- नुकसान भरपाई कायदा, १९२३
- नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण विधेयक, २०१०

**५) इतर महत्त्वाचे कायदे**

- कुटुंब न्यायालय कायदा, १९८४
- राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९०
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००६
- माहिती अधिकार कायदा, २००५

**मानवी अधिकार आणि भारतीय महिलांची स्थिती**

महिला सक्षमीकरणासाठी केंद्र आणि महाराष्ट्र शासनाच्या ५५ पेक्षा अधिक योजना आहेत. केवळ कायदा करून स्त्रीयांच्या मानवी हक्कांचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे अपरिहार्य आहे. स्त्रियांना कायद्याचा आधार नव्हे कौटुंबिक व सामाजिक सुरक्षेची आवश्यकता आहे.

२०११ जनगणनानुसार देशाच्या लोकसंख्येत ५१.५४% पुरूष तर ४८.४६% स्त्रीया आहेत. देशात अजून ४३% स्त्रिया अशिक्षित आहेत. महिला कामगारांपैकी ६५% शेतीमध्ये राबतात. त्यापैकी ४१% महिला शेतमजूर आहेत. फॅक्टरीमध्ये १५.६% महिला काम करतात. ५.७% महिला गृहउद्योगात आहेत.

महिलांचा शिक्षणस्तर आणि कामाचे स्वरूप बघितले तर अन्याय, अत्याचारात वाढ का होत आहे हे समजते. बहुतेक महिला या असंघटित क्षेत्रात काम करतात. साहजिकच तेथे त्यांची बाजू घेणारे कोणी नसते.

शिक्षीतपणा, कमी शिक्षण, गरीबी, कायद्याचे अज्ञान, मानसिक दुर्बलता ळे स्त्रीवर सतत अत्याचार वाढतात.

एनसीआरबी २०१४ ची आकडेवारी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो १४ रिपोर्टनुसार ३,३७,९२२ नोंदी महिला हिंसाचाराच्या आहेत. रिपोर्टनुसार देशात दर १५ मिनिटाला एका महिलेवर बलात्कार होतो अर्ध्या तासात ७ महिलांवर कौटुंबिक अत्याचार होतो. हे आकडे त कमी आहेत. कारण बहुसंख्य महिला अन्याय अत्याचाराच्या धात तक्रार देखील करत नाही. आजही एक करोडपेक्षा जास्त स प्रलंबित आहेत. २०११ जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ,२३,७४,३३३ असून यापैकी ५,४१,३१,२७७ एवढी महिलांची ख्या आहे. लोकसंख्या व बजेटचा विचार केला असता ४८% हिलांकरिता महाराष्ट्र सरकारच्या एकूण प्लान बजेट खर्चाच्या केवळ % रक्कम महिला व बालकल्याण विभागाला दिलेली आहे. महिला व लकल्याण हा विभाग महिला संदर्भात विशेष योजना राबवित असताना स्थिती आहे तर इतर विभागातील महिलांच्या योजनांबद्दल काय थिती असेल याचा विचार आपण करू शकतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजतो.''

**सारांश**

महिला सबलीकरणाच्या सर्व प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या सर्व भागीदारांचे सहभागीत्व जोपर्यंत मानसिकदृष्ट्या क्रियाशील होत नाही तोपर्यंत महिला सबलीकरणाची प्रक्रिया पूर्णत्वाला जाऊ शकत नाही. केवळ कायदा करून स्त्रीयांच्या मानवी हक्कांचा प्रश्न सुटणार नाही. महिला संदर्भातील स्वतः महिलांची व पुरुषांची मानसिकता अद्याप बदललेली नाही. ती बदलवणे काळाची गरज आहे.

**संदर्भसूची**


१) देशमुख अरुण – मानवी हक्क आयोग , मनोरमा प्रकाशन मुंबई
२) प्रा.पी.के.कुलकर्णी – मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती.
३) मानव विकास अहवाल, भारत सरकार –२०११
४) डॉ.अरुंधती पाटील – स्त्री; आत्मभान ते सबलीकरण, अरुणा प्रकाशन लातूर.


Volume 8 (Special Issue 11)
April, 2018


ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768







१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

## सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Editor : Dr. R.V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | प्रा.डॉ. सुनिल पानपाटील | डॉ.बाबासाहब आंबेडकर : भारतीय संविधान का निर्माण और राजभाषा हिंदी का प्रावधान | 74-76 |
| 22 | प्रा.डॉ युवराज वसंत पाटील | शिक्षण हे वाघिणीचे दूध - डॉ.बाबासाहेब आंबेडकर | 77-79 |
| 23 | प्रा.डॉ.सुनिल व्ही. कुवर | सत्यशोधक चळवळीतील महात्मा फुलेंचे योगदान | 80-83 |
| 24 | प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, म. फुले आणि भारतीय अर्थव्यवस्था | 84-87 |
| 25 | प्रा.डॉ.सौ. लता विलास गुप्ते | राजर्षी शाहू महाराज - सामाजिक क्रांतीकारक | 88-89 |
| 26 | प्रा. व्ही.जो. सोमकुवर | राजश्री शाहू महाराज यांच्या लोकोपयोगी कार्याचे ऐतिहासिक अध्ययन | 90-92 |
| 27 | प्रा. माधव शं. वाघमारे | राष्ट्रपिता म.फुले एक कृतिशील विचारवंत | 93-95 |
| 28 | प्रा. डी. आर. कोळी | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार | 96-98 |
| 29 | दिपक बाबुलाल शिरसाट | महात्मा फुले यांचे वाङ्मयीन कार्य | 99-101 |
| 30 | प्रा. योगेश जगन्नाथ कोरडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौध्द धर्म तत्त्वज्ञान | 102-104 |
| 31 | प्रा. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे | सत्यशोधक चळवळीला महात्मा फुलेंचे योगदान | 105-106 |
| 32 | KIRAN SURESH MARATHE | Contribution of Dr.Ambedkar towards women empowerment reforms in India through law | 107-110 |
| 33 | Prof. Bagul Jitendra Bhimrao | Dr. Babasaheb Ambedkar and his great contribution for labour welfare | 111-114 |
| 34 | अंजली लक्ष्मण जोडमोटे | राजर्षी शाहू महाराज यांचे दलितोत्थान / अस्पृश्यतेसंबंधी विचार व कार्य | 115-117 |
| 35 | प्रा. सुनिता संतोष पवार | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक विचार | 118-119 |
| 36 | प्रा.डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे) | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य | 120-122 |
| 37 | प्रा. राहुल पुरुषोत्तम मेघे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणासंबंधी कार्य | 123-125 |
| 38 | प्रा.विलास कचरु पंडित<br>प्रा.डॉ. जितेंद्र श्यामसिंग गिरासे | देवदासी व इतर अनिष्ठ प्रथांनिर्मूलनात महात्मा फुलेंचे योगदान | 126-129 |
| 39 | प्रा. प्रवीण बाबूराव मोरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या संरक्षण विषयक विचार | 130-131 |
| 40 | प्रा.डॉ.सौ. सुषमा प्रमोद पाटील | शिक्षण व मानवता यांना जोपासणारे क्रांतिवीर महात्मा जोतीबा फुले | 132-133 |

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक विचार

प्रा. सुनिता संतोष पवार (समाजशास्त्र विभाग)
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार

आपल्या भारत देशात प्रत्येक व्यक्तिला त्याचा स्वत:चा धर्म पाळण्याचा मुलभूत अधिकार आज जरी राज्य घटनेने दिला असला तरी आपल्या भारतात पूर्वी माणसाच्या जगण्या-मरण्याच्या अधिकारावर सुद्धा हिंदु धर्मातील काही तत्वे अंमलबजावणी करतात. हिंदु धर्मातील आदर्श अशा 'मनुस्मृती' या ग्रंथाने शुद्र व स्त्रियांना कोणताही अधिकार दिला नव्हता. त्यामुळे या लोकांची वर्षानुवर्षे पिळवणूक, शोषण होत होते. मनुस्मृतीमध्ये 'स्त्री' म्हणजे पापाची खाण असं म्हटलं गेलं म्हणून 'स्त्री दर्शन' अशुभ मानले जाऊ लागले. स्त्री हा आपल्या जीवनाचा आपल्या समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे व तिचा माणूस म्हणून विचार झाला पाहिजे. या उलट स्त्री म्हणजे एक उपभोगाची वस्तु आहे, असा विचार आपल्या संस्कृतीत रुजला. स्त्री म्हणजे दावणीला बांधलेले जनावर असते असे हिंदुधर्मातील अनेक ग्रंथांमध्ये लिहून ठेवले गेले. परिणामी समाजामध्ये स्त्रीला कमी महत्त्व दिले गेले.

विषम व्यवस्थेने दलितांना गुलाम बनविले आहे. दलित स्त्री ही गुलामांची गुलाम आहे. जेव्हा-जेव्हा दलितांवर अन्याय-अत्याचार होतात, तेव्हा-तेव्हा दलितांच्या साधन संपत्ती बरोबरच दलित स्त्रीवर ही हल्ला होतो. प्राचीनकाळी भारतात मातृसत्ताक कुटूंबपद्धती होती. कुटूंबात आईला प्रमुख स्थान, तिच्या विचारांना मान, तिचे निर्णय महत्वाचे होते. परंतु आपल्या संस्कृतीचा चुकीचा अर्थ समजून सांगणाऱ्यांनी आपल्या बळाच्या जोरावर मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा ऱ्हास केला आणि पितृसत्ताक कुटुंबपद्धती आणली. त्यामुळे स्त्रीला कुटूंबामध्ये दुय्यम स्थान मिळाले. तिचा जन्म अशुभ मानले जाऊ लागले. त्यामुळे तिचे सबलीकरण होण्याऐवजी दुर्बलीकरणच झाले.

स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून असते, असे बाबासाहेबांचे मत होते. बाबासाहेबांची स्त्रीमुक्तीची वैचारिक बैठक गौतमबुद्ध, ज्योतिबा फुले, कबीर या तीन गुरुंच्या प्रभावातून निर्माण झाली होती. पुरुषप्रधान धर्म व्यवस्थेत स्त्रिया या पुरुषांच्या गुलाम आहेत. बालविवाह, पुनर्विवाहास विरोध, विधवा विवाहास विरोध, सतीची चाल अशा घातक रुढीपरंपरेच्या बेड्यांनी स्त्रियांना जखडून ठेवले आहे, हे त्यांनी जाणले. स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला कवडीचीही किंमत नाही. धर्म कोणताही असो पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीच्या स्वातंत्र्याबद्दल आजही गैरसमज आहेत. स्त्री स्वातंत्र्यामुळे समाजात स्वैराचार माजेल, अनैतिकता, पाश्चात्याचं अंधानुकरण, कुटूंबसंस्थेचा विध्वंस इ. दोष निर्माण होतील, अशी टीका केली जाते. स्त्रियांची सर्जनशीलता केवळ मुलं जन्माला घालण्यापुरती मर्यादित न ठेवता, विविध क्षेत्रांत तिला कर्तृत्वाची उंच शिखरं गाठण्याची संधी देणं, यात मानव जातीचे हित आहे, ही भूमिका घेऊन डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीचा वसा घेतला.

इ.स. १८३३ साली सार्वजनिक शिक्षणाचा कायदा जरी इंग्रजांनी केला असला तरी उच्चवर्णीय समाजातील लोक हे शिक्षण दलित, शूद्र स्त्रियांच्या पर्यंत पोहचविण्यास तयार होत नव्हते. परंतु महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन समाजातील अनेक अज्ञानी स्त्रियांना शिकवण्यासाठी प्रवृत्त केले. त्यानंतर ही प्रगती हळूहळू होतच राहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते. त्यांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरुन करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती.

स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, मजुर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्तिवेतनाची तरतूद यासारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख आवश्यक आहे. एक भारतीय नागरिक म्हणून स्त्रियांना ते सर्व हक्क असावेत जे पुरुषाला असतात. स्त्रीला खऱ्या अर्थाने एक नागरिक, स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावं यासाठी ठोस विचार व खंबीर भूमिका घेऊन डॉ. आंबेडकरांनी हिंदु कोड बिलाचा मसुदा मांडला. हिंदु कोडबिलातील स्त्रीला मिळालेले हक्क व अधिकार महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला चालना देणारे होते. द्विभार्या प्रतिबंध, घटस्फोटाचा अधिकार, वारसा हक्क, दत्तक कायदा, स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेली समान संधी इ. अनेक

गोष्टींना कायद्याचे रुप देण्याचा प्रयत्न हिंदु कोड बिलाच्या रुपाने त्यांनी केला. स्त्रियांना स्वयंनिर्णयाच्या अधिकारापासून वंचित केल्यास राष्ट्रीय आर्थिक विकासाची गती रोखली जाईल. म्हणून स्त्रिया स्वालंबी असल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढलं पाहिजे, जुन्या चालीरीती, परंपरांवर आधारित असलेली क्रूर विषमता, समाजातील रुढी-परंपरा की ज्या स्त्रियांना मानसिक, शारीरिक दुबळं बनवितात, स्त्रियांचा स्वातंत्र्य नष्ट करतात अशा विषमतेत होरपळणाऱ्या स्त्रियांना स्वतंत्र करणं, समान हक्क प्राप्त करुन देणे हा हिंदु कोड बिलाचा उद्देश्य होता.

बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करुन घेतले. १९२७ चा महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, १९३० चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह व १९४२ चा नागपुरात महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी पुढे यायला हवे हा विचार बाबासाहेबांनी मांडला. ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला.

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांचा समग्र विकास आणि उत्थानासाठी हिंदुकोड बिल सादर केला. त्यावेळी बाबासाहेब भारताचे कायदेमंत्री होते. हे बिल सात वेगवेगळया घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रुपांतर करु पाहणारे होते हे सात घटक पुढीलप्रमाणे - १) जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत पावली असेल अशा मृत हिंदु व्यक्तीच्या मालमत्तेच्या हक्कांबाबत. २) मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार. ३) पोटगी. ४) विवाह. ५) घटस्फोट. ६) दत्तक विधान. ७) अज्ञानत्व व पालकत्व. हे सातही विषय स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. भारतीय संविधान जात, धर्म किंवा लिंगभेद करुन मानवप्राण्यात कायदा भेदाभेद करणार नाही. न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल, अशी घोषणा करुन स्वातंत्र्य व समता या तत्वांचा अंगीकार केलेला होता. या पार्श्वभूमीवर हिंदु स्त्रियांना तिचे हक्क देण्यास विरोध झाला. या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला. हिंदु कोड बिल संमत व्हावे म्हणून बाबासाहेब एकटेच लढले. पण या बिलाची केवळ चार कलमेच मंजुर झाली होती. परिणामी अत्यंत दुःखी होऊन डॉ. आंबेडकरांनी कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

हिंदु कोड बिल जरी पास झालं नसलं तरी बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत. हिंदु कोड बिलाचे चार वेगळवेगळे भाग करुन हे चार ही कायदे वेगवेगळया वेळी नेहरुंनी मंजूर करुन घेतले.

इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदु कायदे म्हणजे - १) हिंदु विवाह कायदा, २) हिंदु वारसाहक्क कायदा, ३) हिंदु अज्ञान व पालकत्त्व कायदा, ४) हिंदु दत्तक व पोटगी कायदा. हे कायदे मंजूर होणे म्हणजे कायद्याच्या इतिहासातली एक क्रांतिकारक घटना होय. या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार काळाच्या कक्षा ओलांडून जाणारे होते. समस्त मानवजातीच्या आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांसाठी ते लढले. डॉ. आंबेडकरांनी, कायद्याच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे जे कार्य केलं ते ऐतिहासिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत स्त्री स्वातंत्र्याची चर्चा विज्ञान, तंत्रज्ञान, पोलीस, शिक्षण आदि क्षेत्रात स्त्रियांचा जो सहभाग आहे. त्यामागे डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कार्यकर्तृत्वाची संपदा आहे.

संदर्भ ग्रंथ -

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - फडके भालचंद्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८५.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे चरित्र - कीर धनंजय, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९६६.
३) डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोड बिल - चांगदेव खैरमोंडे, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २०१०.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार - शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, २००९.

-----------------------------*****-----------------------------